International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 4 March-April 2024

# यशवंतराव चव्हाण: आधुनिक महाराष्ट्राचे निर्माणकर्ता

**प्रा. गणेश रविंद्र स्वामी**
सहाय्यक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर
तालुका- वाळवा, जिल्हा- सांगली
**Corresponding Author: - प्रा. गणेश रविंद्र स्वामी**
**Email:** ganeshswami22791@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.11124485**

**प्रस्तावना -**

नवमहाराष्ट्राच्या निर्मितीत ज्या युगपुरुषाने महत्वाची कामगिरी बजावली त्यात यशवंतराव चव्हाण यांचे नाव प्रथम घ्यावे लागेल. आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीसाठी त्यांनी महत्वाचे योगदान दिले आहे. अर्थकारण, शिक्षण, सहकार, संरक्षण, शेती, औद्योगिकरण, लोकशाही, परराष्ट्रीय धोरण, समाजवाद, यासारख्या विविध क्षेत्रात यशवंतरावांची भूमीका महत्वाची आहे. प्रगत महाराष्ट्राच्या दृष्टीने त्यांनी आपले विचार लेखणीतून साकारलेले दिसून येतात, महाराष्ट्र सर्व क्षेत्रात आघाडीवर आहे. प्रत्यक्षात आज महाराष्ट्राला देशात जे स्थान आहे. ते मिळवून देण्यासाठी यशवंतरावांचा महत्वाचा वाटा आहे. यशवंतराव चव्हाण त्यांच्या राजकीय जीवनात उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री, परराष्ट्र मंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री अशी विविध पदे भूषविली. महाराष्ट्र प्रत्येक क्षेत्रात कसा पुढे जाईल असा ध्यास त्यांचा होता. केंद्रात असूनसुद्धा महाराष्ट्राच्या विकासाचे नियोजन यशवंतराव करायचे. समाजकारण, राजकारण यापलीकडे लोकसेवा करण्याकडे यशवंतरावांचा कल होता.

**उद्दिष्टे-**

- आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून यशवंतराव यांची भूमिका स्पष्ट करणे.
- महाराष्ट्र चळवळीतील यशवंतरावांची भूमिका स्पष्ट करणे.
- यशवंतरावांची महाराष्ट्राबद्दलची भूमिका स्पष्ट करणे.
- यशवंतरावांचे सर्व घटकाबद्दल विचार व्यक्त करणे.
- भविष्यातल्या महाराष्ट्राची जडणघडण याबाबतीत यशवंतरावांचा विचार सांगणे.
- यशवंतरावांनी राजकारणातून समाजकारण कसे केले हे सांगणे.
- आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील यशवंतरावांचे राजकीय आणि सामाजिक विचार स्पष्ट करणे.
- केंद्रात राहून सुद्धा महाराष्ट्राबद्दलची यशवंतरावांची तळमळ स्पष्ट करणे.
- आजच्या महाराष्ट्रातील राजकारणात यशवंतरावांचे मौलिक विचार कसे महत्वाचे ठरतात हे सांगणे.

**विषय विवेचन-**

स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेल्या युवा पिढीला महाराष्ट्राचे शिल्पकार आदरणीय असे यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यकर्तृत्वाने सौजन्यातील संयमी संस्कृत व रसिक व्यक्तिमत्त्वाने असेच भारावून टाकल्याचा प्रत्येक पदोपदी येतो. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात यशवंतराव मुख्यमंत्री नसते तर संयुक्त महाराष्ट्र आणखी पाच पंचवीस वर्षे मिळाला नसता अशी खात्री आहे.स्वातंत्र्य काळात यशवंतरावांनी निभवलेली भूमिका महत्त्वाची आहे.

सन १९५६ ते १९६२ हा यशवंतरावांच्या जीवनातील सुवर्णकाळ होता.ज्याला आपण टर्निंग पॉईंट म्हणतो तो यशवंतराव यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट या काळात आला.

ऐतिहासिक घटना घडतात त्या ऐतिहासिक व्यक्तींना जन्म देण्यासाठीच संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि आणि भाषिकांची निर्मिती या अशाच ऐतिहासिक घटना होत्या या घटना मधूनच यशवंतराव बळवंतराव चव्हाण सारखा युगपुरुष जन्माला आला. नव्याने जन्माला आलेल्या द्विभाषिकांचा मुख्यमंत्री कोण या प्रश्नाच्या उत्तरासाठी हालचाली वेगाने वाढू लागल्या प्रतिदिन शहा कटशहा मागच्या हालचाली,त्यानंतर मुख्यमंत्री होण्यास मोरारजी तयार होते. परंतु आपली निवड बिनविरोध झाली पाहिजे अशी त्यांची अट होती,भाऊसाहेब हिरे यांनी या गोष्टीला विरोध केला त्यांना स्वतःलाही मुख्यमंत्री पदाची महत्वकांक्षा होती आपली निवड बिनविरोध होत आहे हे मोरारजी यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी निवडणुकीच्या रणांगणात स्वतःहून यशवंतरावांना पुढे केले

शंकररावांना कोणत्याही परिस्थितीत यशवंतरावांना मुख्यमंत्री होऊ द्यायचे नव्हते त्यांचा ओढा भाऊसाहेब हिऱ्यांकडे होता परंतु भाऊसाहेब हिरे यांना बहुसंख्यचा पाठिंबा नाही हे त्यांच्या लक्षात आले आणि त्यांनी मोरारजींकडे वैकुंठभाई मेहता किंवा सी.डी. देशमुख यांना मुख्यमंत्री करण्यासाठी आग्रह धरला परंतु या दोघांनी या गोष्टीला साफ नकार दिला.

१६ ऑक्टोबर १९५६ रोजी विधिमंडळ काँग्रेस पक्षाची बैठक भरली बैठकीत यशवंतरावांनी नेते पदासाठी मोरारजींचे नाव सुचवले आणि आपले नाव मागे घेण्याची तयारी दर्शवली, परंतु भाऊसाहेब हिरे स्वतःचे नाव मागे घेण्यास तयार नव्हते. मोरारजींची निवड बिनविरोध व्हायला त्यांचा विरोध कायम होता. निवडणूक बिनविरोध होत नाही हे बघून मोरारजींनी स्वतःचे नाव मागे घेतले आणि यशवंतराव चव्हाण व भाऊसाहेब हिरे यांच्यात मुख्यमंत्री पदाचा सामना निश्चित झाला. मतदान झाले आणि या मुख्यमंत्री पदाच्या निवडणुकीत यशवंतराव प्रचंड बहुमताने विजयी झाले. यशवंतराव बळवंतराव चव्हाण हे विशाल द्विभाषिकाचे मुख्यमंत्री झाले. शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री झाला, सागर लहरी जात होता विठ्ठलाचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला | वाळवंटी सागर तटी पताका मांडीला | मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे निगार घाट उघडण्यासाठी नियतीने रेशमी हातांची योजना केलेली होती ते यशवंत हात महाराष्ट्राला यशवंत करणार होते.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न असतानाही मुख्यमंत्री यांना त्यांनी द्विभाषिक राज्य प्रामाणिक आणि प्रयत्नपूर्वक राबविण्याचे ठरवले. एक मुख्यमंत्री या नात्याने द्विभाषिक राज्याकरिता जे जे चांगले करता येईल ते ते करावे यास त्यांनी प्रारंभ केला. आपल्या विरोधकांचे मत सुद्धा महत्त्वाचे मानून प्रसंगी विरोधकांशी चर्चा करून त्यांनी आपल्या राज्याचा गाडा हाकण्याचा प्रयत्न चालू ठेवला. यशवंतरावंचे राज्य क्षेत्रफळाचे बाबतीत भारतातले सगळयात मोठे व लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचे झाले होते. सौराष्ट्रातील राजकोट पासून रत्नागिरी पर्यंत व मुंबईपासून ते पूर्वेला आंध्र पर्यंत हे राज्य पसरले होते.या प्रचंड राज्याच्या राज्यकारभार परिणामकारक करण्यासाठी अखंड धावाधाव करावी लागणार होती.

सन १९५६ ते १९६२ असा यशवंतरावांचा सुवर्णकाळ होता. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या दृष्टीने एक महत्त्वाचा काळ होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, नवमहाराष्ट्राची निर्मिती, चिनचे भारतावर आक्रमण आणि मोठ्या नाट्यमयरित्या यशवंतरावांची भारताचे संरक्षण मंत्री पदावर झालेली निवड या सर्व गोष्टी या काळात घडल्या. मुख्यमंत्री झाल्यावर सुरुवातीला यशवंतरावांनी मंत्र्यांच्या बंगल्यांची जे ब्रिटिश नाव होते ते काढून नवीन मराठी नावे दिली. मराठी जनता यशवंतरावांना सह्याद्रीचे प्रतीक म्हणत होती, सह्याद्रीची निवड यशवंतरावांनी आपल्या वास्तव्यासाठी केली. त्यांनी स्वतःच्या बंगल्याचे नाव सह्याद्री दिले.

नंतर आपल्या द्विभाषिक राज्याचा विकास जोरदारपणे घडवून आणण्यासाठी यशवंतरावांनी नियोजन करायला सुरुवात केली. सरकारची सर्व खाती व त्यांच्या कचेऱ्या एकाच ठिकाणी नांदाव्यात याकरता सचिवालयाची सहा मजली इमारत बांधण्याचा निर्णय घेतला.

राज्याच्या उद्योगधंद्यांना आर्थिक मदत देण्याची गरज निर्माण झालेली होती. त्यामुळे यशवंतरावांनी द्विभाषिक राज्यातील सर्व भागातील उद्योगधंद्याची आर्थिक गरज भागवण्यासाठी मुंबई राज्य फायनान्शिअल कॉर्पोरेशनची स्थापना केली. राज्याच्या कोणकोणत्या भागात उद्योगधंद्याची वाढ होऊ शकते याची चाचपणी यशवंतरावांनी सुरू केली. मुंबई राज्य औद्योगिक दृष्ट्या पुढे नेण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू झाले.

नाट्यकलेला उत्तेजन देण्यासाठी यशवंतरावांनी महत्वाकांक्षी बक्षीस योजना हाती घेतली. नाटकाच्या पुस्तकांना बक्षीस देणे, शिक्षण संस्थातील नाट्य महोत्सव, खुले नाट्यगृह बांधणे, आर्थिक विवंचनेत पडलेल्या जुन्या नाटककारांना आर्थिक मदत देणे, संगीत ,नृत्य,नाट्यशाळांना अनुदान, तमाशा,बक्षीस आदी गोष्टी रसिक मनाच्या यशवंतरावांनी सुरू केल्या. हे सर्व प्रथमच घडत होते त्यामुळे जनतेला हा बदल जाणवू लागला यांच्या हिताचे निर्णय घेतले. त्यावेळी यशवंतरावांवर टीका होत होती त्या टीकेचे उत्तर शांतपणे ते आपल्या भाषणातून देई. रयतेचा राजा अंगावर अपमानांचा घाव घेऊन एकटा लढत होता. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे यासाठी सुद्धा शैक्षणिक कार्य केले. शेतकरी हेच महाराष्ट्राचे राज्यकर्ते आहेत शेतकऱ्यांकरिता विधायक कायदे करून उत्पादन वाढवण्याचा त्यांचा निर्धार होता. संबंध देशात १९५६ मध्ये कुळ कायदा लागू झाला होता. कसेल त्याची जमीन हे कुळ कायद्याचे सूत्र होते. मुंबई राज्यात यशवंत नावाच्या नेतृत्वाखाली हा क्रांतिकारक कायदा लागू झाला. राज्यातील सर्व कुळात १ एप्रिल १९५७ रोजी ते कसत असलेली जमीन त्यांच्या मालकीची झाली असे समजण्यात आले. जमिनीचा कब्जा कोणाला देण्यात आला सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये या कायद्याने आनंदोत्सव पसरला आपण कसत असलेली जमीन आपली झाल्याची भावना सर्वांना समाधान देणारी होती.

या कायद्यामुळे हिरीरीने शेतीला लागले शेतीच्या उत्पन्नात वाढ झाली.

पाच लक्ष किलो वॅट वीज देणारी कोयना जलविद्युत योजना यशवंतराव यांच्या प्रयत्नाने सुरू झाली. कोयना जलविद्युत योजनेच्या २०७ फुटाची या धरणाचा काँग्रेसचा बांध घालण्याला सुरुवात यशवंतराव यांच्या हस्ते झाली. कोयना जलविद्युत योजना यशवंतराव यांच्या प्रयत्नाने सुरू झाली. प्रकल्पाचे काम असो, धरणाची कामे असो पायाभूत सुविधा, रस्ते विकास या सगळ्या विकासाच्या बाबतीत धडाडीने निर्णय घेतले.

चित्रपट व्यवसायाला प्रोत्साहन दिले. चित्रपट व्यवसाय बहरावा,चित्रपट निर्मात्यांना उत्कृष्ट दर्जाचे चित्रपट निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी यशवंतरावांनी आपल्या राज्यात करमणूक करात सूट दिली, साहित्य क्षेत्रात प्रादेशिक भाषेतून लिहिलेल्या पुस्तकांना बक्षीस देण्याचा व नवोदित लेखकांना प्रोत्साहन देण्याचा उपक्रम यशवंतरावांनी सुरू केला. विद्वान, संशोधक, लेखक, कलावंत, दिग्दर्शक, संगीतकार, नाटक, ग्रंथ यांना पहिल्या प्रथमच बक्षीस देण्याचा प्रघात त्यांनी प्रथम सुरू केला. असे सर्व जनहिताचे निर्णय यशवंतराव करीत होते व त्याची अंमलबजावणी करत होते.

महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि राजकीय जाण असलेले यशवंतरावांनी गुढीपाडव्याला सुट्टी देण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांचे जन्मदिनी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनी शासकीय सुट्टी देण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. या निर्णयाचे महाराष्ट्रात जोरदार स्वागत झाले.

यशवंतरावांनी लोककल्याणकारी निर्णयाचा धडाका लावला होता. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या आनंदप्रित्यर्थ यशवंतरावांनी महत्त्वाची घोषणा केली. त्यानंतर १ मे १९६० हा दिवस संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा मुहूर्त ठरलेला होता. २० एप्रिलच्या रात्री बारा वाजून एक मिनिटांनी संयुक्त महाराष्ट्राची घोषणा पंतप्रधान पंडित नेहरू करणार होते. सरकारी समारंभ राजभवनावर योजलेला होता तर जनतेकरिता शिवाजी पार्कवर समारंभ आयोजित केलेला होता. वैदिक सुक्तांच्या विधी घोषणात महाराष्ट्र राज्य अनावरण समारंभ राजभवनावर प्रारंभ झाला. रात्री बारा वाजून एक मिनिटांनी विद्युत माळीने आखलेल्या महाराष्ट्राच्या नकाशा पुढील रेशमी पडदा पंडित नेहरूंनी बाजूला सारला आणि संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाले. शिंगे वाजू लागली, मुंबई शहरातील सर्व गिरण्यांचे भोंगे वाजू लागले, जनतेचे राज्य आणि जाणता राजा जन्माला घालणारा हा क्षण होता, राजभवनावरच्या या दिमाखदार सोहळ्यात आपल्या भावना व्यक्त करताना यशवंतराव म्हणाले आज पंडितजींना आम्ही आश्वासन देऊ इच्छितो की, महाराष्ट्राचे हे राज्य निर्माण झाले आहे ते मराठी जनतेच्या कल्याणाचे; काम तर करीलच परंतु मराठी भाषेच्या जवळ जे देण्यासारखे आहे त्यांच्या जीवनामध्ये जे चांगले आहे, आणि जर काही त्याचा त्याग जर करावयाचा असेल तर तो आम्ही भारतासाठी प्रथम करू; कारण आमचा हा पहिल्यापासून विश्वास आहे की भारत राहिला तर महाराष्ट्र राहील; भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल. भारताचे आणि महाराष्ट्राचे हित जेव्हा एकरूप होते तेव्हा भारतही मोठा होतो आणि महाराष्ट्रही मोठा होतो. हा इतिहास महाराष्ट्राच्या रक्ता रक्तातून जन्मलेला आहे. भारताचे प्रतीक हिमालय आहे,तर महाराष्ट्राचे प्रतीक सह्याद्री आहे. उंच उंच शिखरे असलेला बर्फाच्छादित हिमालय भारताचे प्रतीक आहे, तर २०० २००,३०० ३०० इंच पावसाचा मारा आपल्या डोक्यावर घेणारा सह्याद्री आमचे प्रतीक आहे. आणि जर कधी भारताच्या हिमालयावर संकट आले तर आपली छाती हिमालयाच्या रक्षणाकरता महाराष्ट्राचा सह्याद्री उभा राहील. यातून यशवंतरावांची महाराष्ट्र बद्दलची तळमळ दिसून येते.

१ मे १९०७ च्या दुपारी नवमहाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळावर सुरू झाला. यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. संयुक्त महाराष्ट्राचा पहिले मुख्यमंत्री होण्याचा बहुमान कृष्णा काठी वाढलेल्या सह्याद्रीचे खरे गुरुप्रती असलेल्या यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांना मिळाला. इतिहासाच्या पानावर यशवंतराव बळवंतराव चव्हाण हे नाव कोरले गेले. बालपणी गरिबीने दुःखाने पडलेल्या यशवंतमनाने बहुतजनांचा आधार होण्याचा निर्धार केला. यशवंतरावांचे बळवंत कार्य महाराष्ट्राला उभे करू लागले, शिल्प घडू लागले. त्यानंतर सहकाराच्या बाबतीत एक विधेयक तयार केले, त्या कायद्यामुळे सहकारी संस्थाचे जाळे निर्माण झाले. कृषी औद्योगिक समाज रचना हे यशवंतराव यांची स्वप्न होते. भारत हा शेतकऱ्यांचा देश आहे . शेती सुधारणा, शेतीचे आधुनिकीकरण, उद्योगधंदे, ग्रामीण भागात वीज पोहोचवणे या बळावर ग्रामीण भागाचा विकास करण्याचा विचार यशवंतराव करीत होते.

यशवंतरावांनी नवीन महाराष्ट्र राज्याचा कारभार आता मराठीत चालवणे गरजेचे होते त्या करता यशवंतरावांनी डायरेक्टरेट ऑफ लँग्वेजेस खाते सुरू केले. मराठी साहित्य, इतिहास, संस्कृत भाषा या क्षेत्रातील

संशोधन करायला उत्तेजन देण्यासाठी मराठी साहित्य व संस्कृती मंडळ यशवंतरावांनी स्थापन केली. महाराष्ट्रातील विद्वानांचा त्यांच्या ज्ञानाचा तसेच जगाच्या ज्ञानमंडळाचा मराठी जनतेला लाभ व्हावा हा उद्देश हेमंडळ स्थापना मागे होता.

यशवंतराव धडाक्यात निर्णय करत होते त्याची अंमलबजावणी करत होते सत्ता राबवत होते. परंतु बऱ्याच दिवसापासून त्यांचे मन एका विचाराभोवती फिरत होते खाली असलेले सत्ताही लोकांकडे सोपवली पाहिजे, सर्वसामान्य मनुष्याच्या हातात सत्ता गेली पाहिजे, तर ती खरी लोकशाही होईल असा यशवंतरावंचा निर्णय झाला होता आणि याच विचारातून त्यांनी जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती स्थापन करून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय घेतला. यशवंतरावांच्या निर्णयाने क्रांती केली, बहुजन समाजाच्या हातात सत्तेची चावी गेली, लोकच लोकांचे राज्य चालवू लागले. यातून यशवंतरावांची दूरदृष्टी दिसून येते आणि आज ही महाराष्ट्राच्या विकासात त्यांची धोरणे महत्त्वाची वाटतात.

शिक्षण, शेती, अर्थव्यवस्था, उद्योग कारभाराचे विकेंद्रीकरण, सहकार, धरण, पाटबंधारे, कला, वाङ्मय, भाषा, साहित्य, संस्कृती उद्योग,दुग्धोत्पादन या सर्व क्षेत्रात यशवंत कृपेने महाराष्ट्र दौडत होता. आधुनिक महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा विकास कामांचा सर्व क्षेत्रात त्यांच्या धोरणांचा महत्त्वाचा उपयोग होतो. यशवंतरावांच्या विचारांचा महाराष्ट्र आजही उपयुक्त ठरतो व तो महत्वाचा ठरतो.

सर्व क्षेत्रातील घेतलेल्या निर्णयांचा भूमिकांचा धोरणांचा अतिशय चांगल्या पद्धतीने आजच्या महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावतो. शेती, अर्थव्यवस्था, उद्योग, भाषा, साहित्य, संस्कृती सर्व क्षेत्रांमध्ये यशवंतरावांचे मौलिक विचार आजही मार्गदर्शक ठरतात.

**निष्कर्ष:**

यशवंतराव चव्हाण आणि आजचा महाराष्ट्र हा त्यांच्या विचारांचा महाराष्ट्र आहे, इथून पुढच्या काळात आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये तसेच सर्व क्षेत्रांमध्ये यशवंतरावांचे विचार मौलिक ठरतात. यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या विकासाची ध्येयधोरणे ही सुरुवातीपासूनच ठरवली होती आणि नुसतं ठरवली नव्हती तर ती अंमलात सुद्धा आणली होती. आणि म्हणूनच त्यावेळचे विचार, त्यावेळची धोरणे ही आत्ताच्या काळातील फार मोठी विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची कामगिरी बजावतात. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण आजच्या महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने खरंच एक युगपुरुष होते असे मानावे लागेल. आणि म्हणूनच आजचा महाराष्ट्र हा यशवंतरावांच्या विचारांचा महाराष्ट्र आहे आणि म्हणूनच आता महाराष्ट्र हा प्रगतीच्या दृष्टीने फार पुढे आहे असे मानावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ:**

1. चव्हाण, यशवंतराव. युगांतर. सहलेखक कृष्णा पाटील.
2. चव्हाण, यशवंतराव. यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणांचा संग्रह सह्याद्रीचे वारे.
3. चव्हाण, यशवंतराव. ऋणानुबंध.
4. चव्हाण, यशवंतराव. भूमिका.
5. जाधव, ॲड. मयूर. जाणता राजा यशवंतराव चव्हाण.
6. तळवळकर, श्री गोविंद. यशवंतराव चव्हाण: व्यक्तित्व आणि कर्तृत्व.